सं. फौ. ख. क्र.९९३/२०१९
कांता वि. वसंत
नि.क्र. ५१ वर

**आरोपी – वसंत नरसुजी गायकवाड, यांचा उलटतपास, फिर्यादीचे विधीज्ञ श्री. डी. एल. देशमुख यांच्या मार्फत शपथेवर सुरु – (वेळ–१.२०)**

हे म्हणणे खरे नाही की, मला बँकेत नोकरी करून १५ वर्ष झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१२ पासून बँकेत नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बँकेच्या शाखा बऱ्याच ठिकाणी असून त्यापैकी एक शाखा जामठी येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला बँकेच्या नियमांची जाणिव आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मौजे अकोट, जि. अकोला, शेत सर्वे नं.४७४, ४७८/३ मधील प्लॉट क्र.१५ एकुण क्षे.९४ मी. वर्ग हे माझ्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॉटवर घर बांधकामासाठी २०१४ साली मला माझ्याच बँकेतून गृहकर्ज मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी २०२४ साली गृहकर्ज निल केले. हे म्हणणे खरे नाही की, त्या १० वर्षांत सदर मालमत्ता बँकेकडे गहाण होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६.११.२०२४ बँकेने मला नो–ड्यु प्रमाणपत्र दिले. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज परतफेड करतांना मी स्वत:जवळील रू.२,५२,०००/– भरले होते व त्यानंतर मला १४ लाख रूपये कर्ज मंजुर झाले होते. सन २०१२ मध्ये मला ६५ हजार रूपये पगार होता. सदर कर्ज परतफेड करतांना पगारातून होणाऱ्या कपाती व्यतिरिक्त मी इतर कोणतेही पैसे भरले नव्हते.

प्रश्न :– नि.५७ मध्ये पगाराव्यतिरिक्त पैसे तुम्ही भरल्याचे नमुद आहे, ते चुकीचे आहे का?
उत्तर :– पैसे मी भरले नाहीत, बँकेने भरले.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पगारातून दर मला रू.१७,८००/– ची परतफेड गृहकर्जामध्ये होत होती. हे म्हणणे खरे नाही की, २०१४–२०२४ या काळामध्ये मी फिर्यादीकडून पैसे घेवून माझ्या खात्यात जमा केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याची नोंद माझ्या खात्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर्ज मंजुरीनंतरच माझ्या मुलीचे लग्न झाले. माझ्या घराचे बांधकाम २०१५ साली पुर्ण झाले. हे म्हणणे खरे आहे की, मी प्लॉटची खरेदी फिर्यादीला २०१७ साली करून दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आठ दिवसानंतर ती खरेदी पलटून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मालमत्ता बँकेकडे गहाण होती, म्हणून मला खरेदी करून देण्याचा अधिकार नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मालमत्ता गहाण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी सदर घर माझ्या मालकीचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६.०६.२०१८ रोजी मी सदर मालमत्ता हरीष गोपाल टावरी यांना विकली. हे म्हणणे खरे नाही की, सदर मालमत्ता बँकेकडे गहाण असून देखील मी बेकायदेशीररित्या त्याच्या खरेद्या करून दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीकडून तीन लाख रूपये मी बँकेत भरण्याकरीता घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी बेकायदेशीररित्या व्याजाचा व्यवहार करते, हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहित नाही की, स्वाक्षरी करून कोरे धनादेश देणे हे बेकायदेशीर आहे, हे मी बँकेत नोकरीस असल्यामुळे मला माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, मी, फिर्यादीने कोरे चेक घेतले म्हणून कोणतीही नोटीस दिली नाही किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही तिच्याविरूद्ध केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पैसे घेवून चेक दिले होते, म्हणून फिर्यादीस नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी परतफेड केली नाही,

म्हणून फिर्यादीने माझ्याविरूद्ध प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी २०१९ मध्ये अकोला शाखेत कार्यरत होतो. मी अकोला शाखेत किती वर्ष कार्यरत होतो, हे मला आठवत नाही. हे मला माहित नाही की, ती शाखा अकोला येथे मलकापूर रोडवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०९.२०१९ रोजी फिर्यादीने पाठविलेली नोटीस माझ्या अकोला शाखेत मला मिळाली व घेणार म्हणून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस न मिळाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीकडून घेतलेले तीन लाख रूपये मला परत करावयाचे नाहीत, म्हणून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,**

RADHARAMAN RAMDAS PAKADE
Digitally signed by RADHARAMAN RAMDAS PAKADE
Date: 2026.04.17 15:50:43 +0530

ठिकाण:मुर्तिजापूर
दि.१७.०४.२०२६.

आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२) मुर्तिजापूर.